## ✧ महाविद्यालयातील उपलब्ध शैक्षणिक सोयी ✧

### कला विभाग

**महाविद्यालयात प्रवेश:**

महाविद्यालयात कला व वाणिज्य विषयात पदवी (बी.ए. व बी.कॉम.) प्राप्त करण्याची व्यवस्था आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे –

### बी.ए. प्रथम व द्वितीय सेमेस्टर

पात्रता :

बी.ए. प्रथम सेमेस्टर कला ह्या वर्गात प्रवेश घेण्याकरिता विद्यार्थ्याने महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाद्वारे घेतली जाणारी १२ व्या वर्गाची परीक्षा विज्ञान, वाणिज्य, कला विषय घेवून उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. ज्या विद्यार्थ्याने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाची किंवा तत्सम विद्यापीठाची मान्यता प्राप्त असलेली समकक्ष परीक्षा अनुत्तीर्ण केली असेल तसेच जे विद्यार्थी इंग्रजी विषयांसह दोन वर्षाची डी.एड. पदविका व एम.सी.व्ही.सी. परिक्षा उत्तीर्ण असतील त्यांनाही प्रथम सेमेस्टर कला या सत्रात प्रवेश प्राप्त होऊ शकेल.

### प्रवेश कार्यपध्दती : (प्रथम सेमेस्टर बी.ए., बी. कॉम.)

1. विद्यापीठ ON-LINE निवड पध्दती द्वारे निवड झालेल्या बी.ए. प्रथम सेमेस्टर/बी.कॉम. प्रथम सेमेस्टर विद्यार्थ्यांची यादी सूचनाफलकावर लावण्यात येईल. कुठल्याही परिस्थितीत विद्यार्थ्याला त्याच्या प्रवेशाची माहिती पत्राने कळविली जाणार नाही. त्यासाठी विद्यार्थ्यांनी सूचना फलक पाहत राहावे. सूचना-फलकावरील सूचना विद्यार्थ्यांनी वाचल्या असे गृहीत धरल्या जाईल.
2. विद्यार्थ्याला ठराविक तारखेला निवड समितीसमोर उपस्थित राहावे लागेल.
3. विद्यार्थ्याला सर्व प्रमाणपत्रे, गुणपत्रिका सोबत आणाव्या लागतील. विद्यार्थ्याने एक फोटो फॉर्मला लावावा व दोन फोटो मुलाखतीचे वेळी सोबत आणावे. एकूण तीन फोटो लागतील. एक पोस्टकार्ड (पत्रव्यवहाराच्या पत्त्यासह)
4. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना दिलेल्या तारखांना किंवा त्यापूर्वी आवश्यक ती फी भरावी लागेल. असे न केल्यास विद्यार्थ्यांचा अपेक्षित प्रवेश रद्द समजला जाईल.
5. प्रथम सेमेस्टरला प्रवेश घेतांना 10 वी किंवा 12 वी ची मार्कलिस्ट व T.C. ची झेरॉक्स प्रत जोडावी.

## प्रवेशाकरीता लागणारी प्रमाणपत्रे

### पदवी वर्ग :

प्रवेशासाठी अर्ज केल्यानंतर प्रवेश प्रक्रियेत विद्यापीठामध्ये सहभागी झाल्यानंतर प्राधान्यक्रमानूसार प्रवेश मेरीट यादीनूसार व महाविद्यालयाचे पसंतीक्रमानूसार देण्यात येईल.

कोणत्याही परिस्थितीत डुप्लिकेट टी.सी. वर कोणत्याही वर्गात प्रवेश दिला जाणार नाही.

1. शाळा किंवा महाविद्यालय सोडण्याचे प्रमाणपत्र (हे प्रमाणपत्र परत केले जाणार नाही.)
2. मूळ गुणपत्रिका
3. संस्था प्रमुखांकडून प्राप्त केलेले चारित्र्य प्रमाणपत्र (हे प्रमाणपत्र परत केले जाणार नाही.)
4. शिवाय वरील 1, 2, 3 मधील प्रमाणपत्रांच्या सत्यप्रतिलिपी अधिकृत व्यक्तीने सत्यांकित केलेले प्रत्येकी एक प्रत. याशिवाय विद्यार्थ्यांनी आपल्याजवळ आवश्यक तेवढ्या सत्यप्रती करून ठेवाव्या. प्रवेश दिल्यानंतर सत्यप्रती करण्याकरिता महाविद्यालयातून मूळ कागदपत्रे मिळणार नाही.
5. महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ अथवा रातुम नागपूर विद्यापीठ या व्यतिरिक्त इतर बोर्ड किंवा विद्यापीठातून येणाऱ्या विद्यार्थ्यांनी मूळ मायग्रेशन प्रमाणपत्र जोडावे. हे पत्र कार्यालयात दाखल करेपर्यंत अशा विद्यार्थ्यांचा प्रवेश अस्थायी राहील.

   आवश्यक माहितीसाठी रू. 10.00 रेकॉर्ड दाखविण्याचे लागतील. कोणत्याही परिस्थितीत कार्यालयाच्या बाहेर कादगपत्र नेता येणार नाहीत. महाविद्यालयात प्रवेश घेतांना, विद्यार्थ्यांनी संपूर्ण शुल्क भरल्यानंतरच प्रवेश अंतिम समजला जाईल.